# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

**०१.०१.२०१७ रोजीची अंतीम सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करणे बाबत....**

क्रमांक.अेपीसी- २ दिनांक २९.१२.२०१७

**परिपत्रक**

विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या चतुर्थश्रेणीतील (गट-ड) मधील मजूर, पहारेकरी, शिपाई, प्रयोगशाळा सेवक, प्रयोगशाळा परिचर, परिचर, माळी, ग्रंथालय परिचर, पुस्तक वाहक, संदेश वाहक, जमादार, फराश, ड्रेसर, सफाई कामगार, रुखी, गुराखी, दोग्धा, मिस्त्री, स्वयंपाकी व पशु परिचर या सर्व संवर्गातील कायम कर्मचाऱ्यांची दिनांक १.१.२०१७ रोजीची तात्पुरती सामुहीक सेवा जेष्ठता सूची विद्यापीठ परिपत्रक क्र.अेपीसी-२ दि. २७.०६.२०१७ अन्वये सामुहीक सेवाज्येष्ठता यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती

सदरील **दि.१.१.२०१७** रोजीच्या यादीमध्ये दर्शविण्यात आलेली सेवाज्येष्ठता ही त्यांचे विद्यापीठातील मुळ रुजू दिनांकानुसार असून ज्या कर्मचा-यांचा रुजू दिनांक एक सारखा आहे, त्यांची सेवा ज्येष्ठता ही त्यांचे वयाची ज्येष्ठतेनुसार ठरविण्यात आलेली आहे. परंतु रोजंदारी मजूर, कुशल, अकुशल व अधिसंख्य कर्मचा-यांची ज्येष्ठता ही हजेरी ज्येष्ठतेने दर्शविण्यात आलेली असुन अपंग,अनुशेष या पदभरती मधील कर्मचारी यांचे त्यांनी प्राप्त केलेल्या गुणानुसार जेष्ठता ठरविण्यात आलेली आहे.

याबाबत सर्व अहरण व संवितरण अधिकारी / कार्यालय प्रमुख आणी संबधीत नियंत्रण अधिकारी यांना कळविण्यात येते की त्यांच्या कार्यालयाच्या आस्थापनेवर **कार्यरत असलेल्या कायम चतुर्थश्रेणी** कर्मचा-यांच्या सदर सेवा जेष्ठता यादीची प्रत संकेतस्थळावरुन प्राप्त करुन त्यांचे निदर्शनास आणून देण्यात यावी. तसेच आपण आपल्या कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचे मुळ सेवापटावरुन त्यांचा जन्म दिनांक, जात प्रवर्ग, विद्यापीठातील प्रथम रुजु झालेल्या पदाचे पदनाम व दिनांक तसेच एखाद्या कर्मचा-याची स्थलांतर/पदोन्नती व्दारे दुस-या पदावर नियुक्ती झाली असल्यास त्या पदाचे पदनाम व त्या पदाचा रुजु दिनांक तपासून पहावा व एखादा कर्मचारी मयत/स्वेच्छा निवृत्त/रुग्णता सेवानिवृत्त झाला असल्यास किंवा एखाद्या कार्यरत कर्मचा-याचे नाव ज्येष्ठता सूचीत दिसून आले नसल्यास तसेच आपल्या कार्यालयातील कर्मचा-याबाबत इतर कोणतेही आक्षेप असल्यास/आक्षेप नसल्यास १५ दिवसाचे आत आपण सदर प्रकरणी संपुर्ण शहानिशा/तपासणी करुन या कार्यालयास **पुराव्यासह व सबंधीत अहरण व संवितरण अधिकारी यांनी सेवापटावरुन तपासणी केल्याच्या प्रमाणपत्रासह कळविण्यात यावेत असे कळविण्यात आले होते त्यांअनुषंगाने** प्राप्त झालेल्या आक्षेपाची पुर्तता करण्यात आलेली आहे.

तसेच सदरील यादीतुन आपल्या संबधीत कर्मचारी यांची पुन्हा मुळ सेवापुस्तकावरुन सर्व तपासणी करावी व काही आक्षेप असल्यास आवश्यक पुराव्यासह या कार्यालयास पाठविण्यात यावा जेणे करुन दिनांक १.१.२०१८ रोजीची सेवाजेष्ठता सुची तयार करतांना त्यामध्ये दुरुस्ती करण्यास सोईचे होईल.

कुलसचिव

प्रतीलीपी : सर्व कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी व अहरण सवितरंण अधिकारी वनामकवि परभणी यांना देऊन कळविण्यात येते की उपरोक्त प्रमाणे कार्यवाही विहीत कालावधी मध्ये करुन या कार्यालयास अहरण व सवितरंण अधिकारी यांनी उपरोक्त प्रमाणे प्रमाणपत्र सादर करावेत.

प्रत : मा कुलगुरु यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव.